MHAH080012312025

## नियमीत दिवाणी दावा क्र.५९१/२०२५ मध्ये निशाणी २१ वरील आदेश

प्रतिवादी क्र.४ ने प्रस्तुत अर्ज कैफियत देण्यास झालेला उशीर माफ होऊन मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.१ हा कॅन्सरच्या आजाराने त्रस्त आहे. त्यांची देखभाल करण्यास प्रतिवादी क्र.४ देखील मदत करते. त्यामुळे वेळेत कैफियत देण्याकामी न्यायालयामध्ये हजर राहू शकले नाहीत. प्रतिवादीने मुद्दाम उशीर केलेला नाही. त्यांची कैफियत अभिलेखावर येणे गरजेचे आहे. सबब, त्यांनी कैफियत देण्यास झालेला उशीर माफ होऊन मिळण्याची विनंती केली आहे.

०२. वादीने प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करून विरोध दर्शविला. त्यांचे म्हणणे असे आहे की, अर्ज खरा व बरोबर नाही. प्रतिवादी मुंबई येथे राहत आहे. प्रतिवादीचे वडील संगमनेर येथे राहात आहेत. प्रतिवादीने कैफियत देण्यास जाणूनबुजून उशीर केलेला आहे. सबब, अर्ज नामंजूर करण्यात यावा, यदाकदाचित अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास प्रतिवादीवर जबर खर्च लादण्यात यावा.

०३. अर्ज व त्यावरील म्हणणे पाहिले. दाव्याचे अवलोकन केले. वादी यांनी प्रस्तुत दावा प्रतिवादींविरुध्द जाहीर ठराव, वाटप व निरंतर मनाईसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.४ दाव्यात हजर होऊनही वेळेत कैफियत दाखल केलेली नाही. दाव्याचे स्वरूप व प्रतिवादीची दाव्याकामी कैफियत देण्याची इच्छा पाहता व उभय पक्षकारांतील दिवाणी वादाच्या समुळ निराकरणाकरिता विलंब क्षमापित करणे न्यायोचित होईल. तसेच प्रस्तुत दावा हा वाटपाचा

असल्याने आणि प्रतिवादी हे दाव्यास आवश्यक पक्षकार असल्याने दावा गुणदोषावर निकाली काढण्याकरिता त्यांची कैफियत/म्हणणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादीस कैफियत देण्याची संधी दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. परंतु याकामी झालेला उशिर पाहता योग्य ती खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र.४ वर बसविणे न्यायोचीत होणार आहे. परिणामी खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१) अर्ज प्रतिवादी क्र.४ वर खर्चाची रक्कम रु.५००/- (पाचशे रुपये मात्र) लादुन मंजूर करण्यात येतो. प्रतिवादीने खर्चाची रक्कम वादीला द्यावी.

२) प्रतिवादी क्र.४ हीस कैफियत देण्यास झालेला उशिर क्षमापित करण्यात येतो.

३) प्रतिवादी क्र.४ हिने खर्चाची रक्कम वादीला दिल्यानंतर कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी.

४) उभय पक्षकारांनी आदेशाची नोंद घ्यावी.

KADUSKAR DEEPALI PARIMAL

Digitally signed by KADUSKAR DEEPALI PARIMAL
Date: 2026.04.07 16:23:28 +0530

ठिकाण- संगमनेर
दिनांक- ०७.०४.२०२६

(श्रीमती डी.पी.कडुस्कर)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
संगमनेर, जि.अहमदनगर.